स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत राज्यातील ९० नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी केंद्र व राज्य शासनाच्या हिश्यातील निधीचा दुसरा हप्ता वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक: स्वमअ-२०१९/प्र.क्र.११०/नवि-३४
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २४ ऑगस्ट, २०२०.

वाचा:

१) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्रमांक: स्वभाअ-२०१५/प्र.क्र.२३/नवि-३४,दि. १५.०५.२०१५.
२) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्रमांक: स्वमअ-२०१७/प्र.क्र.४३/नवि-३४,दि. ३१.०३.२०१७.
३) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक अर्थसं-२०२०/प्र.क्र.६४/ अर्थ-३, दिनांक १६ एप्रिल, २०२०
४) केंद्र शासनाच्या गृह निर्माण व नगरीकार्य मंत्रालयाचे आदेश क्रमांक १/७/२०१५-SBM-I [Computer No. ३१०४७०६], दिनांक १८ फेब्रुवारी, २०२०.
५) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्रमांक: स्वमअ-२०१७/प्र.क्र.११०/नवि-३४,दि. २७.०३.२०२०.

शासन निर्णय:

उपरोक्त वाचा येथील क्रमांक ५ चा शासन निर्णय या शासन निर्णयाद्वारे रद्द करण्यात येत आहे.

२. देशातील सर्व शहरे पूर्णपणे स्वच्छ, निरोगी आणि राहण्यायोग्य करणे आणि सर्व नागरिकांना स्वच्छ व चांगले आरोग्य आणि स्वच्छ पर्यावरण मिळावे तसेच देशातील सर्व सांविधानिक शहरांना स्वच्छतेची आणि या शहरामधील नागरीकांना घरगुती शौचालयांची सुविधा उपलब्ध करून देणे, या उद्देशाने केंद्र शासनाने "स्वच्छ भारत अभियान (नागरी)" ची अंमलबजावणी सुरु केली आहे. या अभियानाच्या धर्तीवर राज्यामध्ये संदर्भाधीन क्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये "स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)" राबविण्यात येत आहे.

३. स्वच्छ भारत अभियानांतर्गत घनकचरा व्यवस्थापनासाठी राज्य शासनामार्फत मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीच्या मान्यतेने ९० शहरांचे रुपये ४,६२,९२,७८,०९३/- (रुपये चारशे बासष्ट कोटी ब्याण्णव लक्ष अठ्याहत्तर हजार त्र्याण्णव फक्त) इतक्या किंमतीचे प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात आले होते. केंद्र शासनाने संदर्भीय क्र. ४ येथील दिनांक १८.०२.२०२० रोजीच्या आदेशान्वये केंद्र शासनाचा अनुज्ञेय हिस्सा रुपये १,६२,०२,४७,३३३/- (रुपये एकशे बासष्ठ कोटी दोन लक्ष सत्तेचाळीस हजार तीनशे तेहतीस फक्त) पैकी दुसरा हप्ता म्हणून रुपये ८१,०१,२३,६६६/- (रुपये एक्याएंशी कोटी एक लक्ष तेवीस हजार सहाशे सहासष्ठ फक्त) एवढा निधी राज्यास वितरीत केला आहे.

४. स्वच्छ भारत अभियानांतर्गत केंद्र शासनाने राज्यातील ९० नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नागरी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पांसाठी राज्यासाठी वितरीत केलेला दुसरा हप्त्याचा निधी रुपये रुपये ८१,०१,२३,६६६/- (रुपये एक्याएंशी कोटी एक लक्ष तेवीस हजार सहाशे सहासष्ठ फक्त) त्या प्रमाणात राज्य शासनाचा रूपये ४८,२४,३५,५३३/- (रूपये अठ्ठेचाळीस कोटी चोवीस लक्ष पसतिस हजार पाचशे तेहतीस फक्त) असा केंद्र व राज्य हिश्याचा मिळून एकूण रूपये १,२९,२५,५९,१९९/- (रूपये एकशे एकोणतीस कोटी पंचविस लक्ष एकोणसाठ हजार एकशे नव्याणव फक्त ) इतका निधी राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना वितरीत

करण्यास शासन मान्यता देत आहे. सदरचा खर्च पुढील तक्त्यात नमूद केल्यानुसार संबंधित लेखाशिर्षासमोर दर्शविल्याप्रमाणे संबंधित लेखाशिर्षाखाली सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात मंजूर करण्यात आलेल्या तरतुदी मधून भागविण्यात यावा.

| अ.क्र | लेखाशिर्ष | अर्थसंकल्पीत करण्यात आलेली निधी रूपये |
|---|---|---|
| अ) | महानगरपालिकांना | |
| १ | मागणी क्रमांक-एफ-२, २२१७, नगरविकास, (८०) सर्वसाधारण, १९१, महानगरपालिकांना सहाय्य, (००) (७६) स्वच्छ भारत अभियानासाठी महानगरपालिकांना सहाय्य (केंद्र हिस्सा ७५%), ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर), (२२१७ ९७५२) योजनांतर्गत | २८,४४,२०,७४०/- (रूपये अठ्ठावीस कोटी चौव्वेचाळीस लक्ष वीस हजार सातशे चाळीस फक्त) |
| २ | मागणी क्रमांक-एफ-२, २२१७, नगरविकास, (८०) सर्वसाधारण, १९१, महानगरपालिकांना सहाय्य, (००) (७७) स्वच्छ भारत अभियानासाठी महानगरपालिकांना सहाय्य (राज्य हिस्सा), ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर), (२२१७ ९७६१) योजनांतर्गत | १३,२२,२३,७९९/- (रूपये तेरा कोटी बावीस लक्ष तेवीस हजार सातशे नव्याणव फक्त) |
| ब) | नगरपरिषद | |
| १ | मागणी क्रमांक-एफ-२, २२१७, नगरविकास, (८०) सर्वसाधारण, १९२, नगरपरिषदांना सहाय्य, (००) (७८) स्वच्छ भारत अभियानांतर्गत नगरपरिषदांना सहाय्य (केंद्र हिस्सा), ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर), (२२१७ ९७७९) योजनांतर्गत | ५१,८०,९५,०३४/- (रूपये एकावन्न कोटी ऐंशी लक्ष पंच्यान्नव हजार चौतीस फक्त) |
| २ | मागणी क्रमांक-एफ-२, २२१७, नगरविकास, (८०) सर्वसाधारण, १९२, नगरपरिषदांना सहाय्य, (००) (७९) स्वच्छ भारत अभियानासाठी नगरपरिषदांना सहाय्य (राज्य हिस्सा), ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर), (२२१७ ९७८८) योजनांतर्गत | ३४,५१,३९,८०६.००/- (रूपये चौतीस कोटी एक्कावन्न लक्ष एकोणचाळीस हजार आठशे सहा फक्त) |
| क) | नगरपंचायतींना | |
| १ | मागणी क्रमांक-एफ-२, २२१७, नगरविकास, (८०) सर्वसाधारण, १९३, नगरपंचायतींना सहाय्य, (००) (०३) स्वच्छ भारत अभियानांतर्गत नगरपंचायतींना सहाय्य (केंद्र हिस्सा), ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर), (२२१७ ९७९७) योजनांतर्गत | ७६,०७,८९२/- (रूपये शहात्तर लक्ष सात हजार आठशे ब्याण्णव फक्त) |
| २ | मागणी क्रमांक-एफ-२, २२१७, नगरविकास, (८०) सर्वसाधारण, १९३, नगरपंचायतींना सहाय्य, (००) (०४) स्वच्छ भारत अभियानासाठी नगरपंचायतींना सहाय्य (राज्य हिस्सा), ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर), (२२१७ ९८०३) योजनांतर्गत | ५०,७१,९२८/- (रूपये पन्नास लक्ष एकाहत्तर हजार नऊशे अठ्ठावीस फक्त) |

५. सदर निधी आहरित करण्यासाठी राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) यांना आहरण व संवितरण अधिकारी तसेच नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी सदर रकमेचे देयक तयार करून ते अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई यांच्याकडे तात्काळ सादर करून सदर निधी आहरित करून धनादेश प्राप्त करून घेण्यात यावा. सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना वितरीत करण्याबाबतची कार्यवाही राज्य अभियान संचालक यांनी करावी.

६. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक **क्रमांक अर्थसं-२०२०/प्र.क्र.**६४/ अर्थ-३, दिनांक १६ एप्रिल, २०२० अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे. केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झाल्याची खात्री वित्त विभागाचे अनौपचारिक संदर्भ क्रमांक: अनौ-१३६/अर्थोपाय,

दिनांक २६.०३.२०२० अन्वये करण्यात आली आहे. शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक **क्रमांक अर्थसं-** २०२०/प्र.क्र.६४/ अर्थ-३, दिनांक १६ एप्रिल, २०२०मधील लागू असलेल्या उर्वरित सर्व अटींची पूर्तता होत आहे.

७. शासन परिपत्रक वित्त विभाग **क्रमांक अर्थसं-२०२०/प्र.क्र.**६४/ अर्थ-३, दिनांक १६ एप्रिल, २०२० मधील ६ अन्वये ३१ वेतनेत्तर सहायक अनुदाने (वेतनेतर) या बाबीखालील खर्च करण्यास विभागास अधिकार प्राप्त झाले आहेत. सदर शासन निर्णयान्वये एकूण रूपये १,२९,२५,५९,१९९/- (रूपये एकशे एकोणतीस कोटी पंचविस लक्ष एकोणसाठ हजार एकशे नव्याणव फक्त ) इतका निधी मंजूर करण्यात येत आहे.

८. सदरचा शासन निर्णय हा वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक : अनौ-१२५/व्यय-३, दिनांक १३.०७.२०२० अन्वये प्राप्त झालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

28.05.2020 28.05.2020

(अ. सा. पालवे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा .मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा .राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव, वित्त, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता )-१, मुंबई.
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता )-२, नागपूर.
६. प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
७. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद संचालनालय, मुंबई.
८. आयुक्त, महानगरपालिका, जळगांव
९. राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी), मुंबई.
१०. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
११. अधिदान व लेखाधिकारी, फोर्ट, मुंबई.
१२. अधिदान व लेखाधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, वांद्रे, मुंबई.
१३. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.
१४. मुख्य लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
१५. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.
१६. मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायत
१७. निवडनस्ती, नवि-३४